**MHKO120001452015**

## नियमीत दिवाणी दावा क्र. ३२/२०१५ मधील

### नि. क्र.११५ वरील आदेश

(अनंत शेट्टी वि. विठ्ठल शेट्टी)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ यांनी वादी विरुद्ध तुर्तातुर्त ताकीद मिळावी याकरिता केला आहे.

२. प्रस्तुतचा दावा वादींनी वाटपाकरिता दाखल केला आहे.

३. प्रस्तुतच्या अर्जात प्रतिवादी क्र. ६ ने असे कथन केले आहे की, मौजे पाटगांव, ता. भुदरगड येथील गट क्र. १५२(अ) व १५२(ब) क्षेत्र ६.२२.६० आर व ३.११.२० आर ही दावा मिळकत आहे व गट क्र. १५२ (अ)ही जमीन वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे नांवे ७/१२ नुसार आहे व गट क्र. १५४ (ब) ही जमीन प्रतिवादी क्र. ६ चे नांवे आहे. वादीने दावा मिळकतीचे वाटप मागितले आहे. प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांची कैफियत दिली असून वादीचा दावा नाकारला आहे. वास्तविक वादी, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचा दावा मिळकतींमध्ये अर्धा हिस्सा आहे व उर्वरित अर्धा हिस्सा प्रतिवादी क्र. ६ चा आहे असे कथन प्रतिवादी क्र. ६ ने कैफियतीत केले आहे व अर्धा हिस्सा स्वतंत्र होवून मिळणेची विनंती प्रतिवादी क्र ६ ने केली आहे.

४. प्रतिवादी क्र. ६ ने पुढे असे कथन केले की, यापुर्वी वादीने तुर्तातुर्त

ताकीद अर्ज (नि. ५) दाखल केला होता व त्यामध्ये या न्यायालयाने दि. ०८/०७/२०१६ रोजी प्रतिवादी क्र. ६ विरुद्ध आदेश पारित करुन प्रतिवादी क्र. ६ ने दावा मिळकत पैकी गट क्र. १५२(ब) या मिळकतीमध्ये ति–हाईत इसमांचे हक्क निर्माण करु नयेत अशी तुर्तातुर्त ताकीद दिली आहे व त्याच आदेशात संबंधीत क्षेत्रावर प्रतिवादीचा कब्जा आहे असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. वास्तविक कोणताही अधिकार नसताना वादीने नि. ९१ ला अर्ज दाखल करुन गट क्र. १५२(ब) या दावा मिळकतीतील झाडे अनाधिकाराने तोडली आहेत व तो अर्ज प्रलंबित आहे. प्रतिवादी क्र. ६ यांचे कब्जे वहिवाटीत असलेल्या झाडेतोड करुन वादी त्यातील लाकूड पळविण्याचे तयारीत आहेत व झाडे तोडून जमीन स्वरुपात बदल केलेस प्रतिवादी क्र. ६ चे नुकसान होणार आहे. झाडे तोडीबाबत पोलीस ठाणे व वनक्षेत्रपाल यांचेकडे तक्रार दिल्यावर त्यांनी न्यायालयात दाद मागणेस सांगितले. वादी व अन्य सह हिस्सेदार हे गट क्र. १५२(ब) मधील झाडे तोडून नेण्याची भिती प्रतिवादी क्र. ६ ला आहे. दि. १२/०४/२०२३ रोजी अंगबळाचे जोरावर बेकायदेशीर मार्गाने दावा मिळकतीतील झाडे तोडून उर्वरित बांधावरील झाडांचीही तोड केली आहे व त्या झाडांचे लाकूड पळवून नेत असलेने अर्जास कारण झाले. वादी हे दावा जमीनीतील झाडे तोडून पळवून नेण्याचे विचारत असलेने ती झाडे व लाकूड जप्त करणे आवश्यक आहे व त्यामुळे, लाकडू व झाडे जप्त करुन त्याची विक्री

करणे आवश्यक आहे व त्यामुळे, प्रतिवादी क्र. ६ ने अशी विनंती केली की, गट क्र. १५२(ब) झाडांची तोड वादीने करु नये अथवा त्या मिळकतीमध्ये कोणताही फेरबदल करु नये अथवा त्याचे स्वरुप बदलू नये अशी तुर्तातुर्त ताकीद दयावी व यापूर्वी तोड झालेल्या झाडांची जप्ती करुन त्याची विक्री करुन त्याची रक्कम न्यायालयात जमा करणेचे आदेश व्हावेत.

५. प्रस्तुत अर्जास वादीने नि. ११७ अन्वये म्हणणे सादर केले. वादीने असे म्हणणे दिले की, संपूर्ण दावा मिळकत ही नि. ३२/१ चे नोंदणीकृत मृत्यूपत्रान्वये दि. १०/०३/१९८७ रोजी वादी व प्रतिवादी क. १ ते ५ चे नांवे झाली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. ६ हिने तिचा पती राजकीय पुढारी असलेचा फायदा घेवून, महसूल कर्मचा–यांशी हातमिळवणी करुन जयवंती चे नांव लावले व तिच्या मृत्यूनंतर तिची मुलगी सुशिला (प्रतिवादी क्र. ६) चे नांव लावले गेले व ती नोंद पोकळ स्वरुपाची आहे कारण दावा मिळकती या वडीलार्जित मिळकती नव्हत्या व दावा मिळकती या शंकर शेट्टी यांचे स्व कमाईच्या होत्या. वास्तविक नि. ५ चे आदेशाचा भंग प्रतिवादी क्र. ६ ने केला आहे त्याबाबत वादीने दाद मागितली आहे व त्याबाबत १० लाख रुपये दंड आकारावा म्हणून नि. ११० अन्वये वादीने अर्ज दिला आहे. वादीने रितसर परवानगी घेवून ७५ झाडे तोडणेस वनपरिक्षेत्र कडगांव यांची पूर्व परवानगी घेवून संबंधीत झाडांचा पंचनामा करुन दिल्यानंतरच ती तोडून त्यांचे ढिगारे

केले आहेत व ते बाजारात पाठविण्यासाठी वादीला २ ते ३ लाख खर्च आला परंतु, प्रतिवादी क्र. ६ हे आडदांड असून त्यांनी संबंधीत विभागाचे अधिका–यांकडू ऑनलाईन अर्ज करुन वादींचे तोडलेली झाले वाहून नेण्यास प्रतिबंध केला. वृक्षाधिकारी, वनपरिक्षेत्र यांनी दिलेल्या परवान्याची कागदपत्रे नि. ११० चे अर्जासोबत वादीने न्यायालयात दाखल केली आहेत. प्रतिवादी क्र. ६ व त्याचे घरातील लोक हे गूंड आहेत व ते कायदा जुमानत नाहीत. वादी हे मालक असलेचे कागदोपत्री पुरावा त्यांनी दाखल केला आहे त्या अनुषंगाने वादी नि. ६ ते १० बाबतचे कागदपत्र दाखल केले आहेत. वास्तविक दिनकर पिळणकर यांनी खोटया व बनावट नोंदी करुन घेतल्या आहेत. वास्तविक दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. ६ यांनी दि. ०१/०९/१९९५ रोजी फेरफार क्र. ११२१ अन्वये बँक ऑफ इंडिया ला गट क्र. १५२(ब) ही मिळकत तारण ठेवली आहे व त्यामुळे न्यायालयाने नि. ५ चे आदेशाने प्रतिवादी क्र. ६ ला दावा मिळकतीत ति–हाईत इसमाचे हक्क निर्माण करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद आदेश पारित केला. तसेच दावा मिळकत गट क्र. १५२(अ) बाबतीत न्यायालयाने नि. ६९ अन्वये प्रतिवादी क्र. ६ ने हरकत, अडथळा करु नये असा तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश न्यायालयाने पारित केला आहे. प्रतिवादी क्र. ६ व तिचे घरातील लोक हे गुंड असल्याने ते जीवे मारण्याची धमकी देतात व खोटया स्वरुपाची फौजदारी खटला क्र. ७६/२०१७ दाखल केला असून

त्यात न्यायालयाने आदेशिका जारी करणेचा आदेश पारित केला आहे. वास्तविक प्रतिवादी क्र. ६ हे दावा मिळकत बळकवण्याचे विचारात आहेत. तसेच या देशातील कायदा कोर्ट जागे असेल तर खरे काय खोटे काय ही बाब अंतिम न्याय निर्णयात येईल व योग्य व कडक शासन ख–या व दोषी लोकांना होणे जरुरीचे आहे कारण या देशात लुटारु, गुंड लोकांचे राज्य येण्यास देखील वेळ लागणार नाही. प्रतिवादी क्र. ६ ने वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेवर अन्याय केला असून त्यामुळे ५ लाख रुपये दंड वसुल करुन वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना देणेत यावा.

६. अर्जातील कथन व दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकल्यावर खालील मुद्दे विचारार्थ येत आहेत व त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह नोंदवत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. ६ हे सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत करतात काय ? | **नकारार्थी** |
| २. | न्यायाचा समतोल प्रतिवादी क्र. ६ चे बाजुने आहे काय ? | **नकारार्थी** |
| ३. | अर्ज नामंजूर झाल्यास प्रतिवादी क्र. ६ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे प्रतिवादी क्र. ६ ने शाबीत केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | ***अंतिम आदेशा प्रमाणे*** |

## कारणमिमांसा

७. वादींनी व प्रतिवादींनी दाखल केलेल्या संबंधित कागदपत्रांचे अवलोकन केले व संबंधीत कागदपत्रांचा उल्लेख योग्य त्या ठिकाणी केलेला आहे.

८. प्रतिवादी क्र. ६ तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, यापुर्वी न्यायालयाने नि. ५ चा अर्ज अंशतः मंजुर करताना दावा मिळकतीपैकी गट क्र. १५२/ब मधील मिळकतीत प्रतिवादी क्र. ६ चा ताबा आहे असे निरीक्षण नोंदवले आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रथमदर्शनी प्रतिवादी क्र. ६ ने असे दाखवून दिले आहे की, दावा मिळकतीमधील गट क्र. १५२/ब मध्ये प्रतिवादी क्र. ६ चा ताबा आहे. त्यामुळे, त्याला हरकत, अडथळा करण्याचा अधिकार वादींना नाही. झाडे गट क्र. १५२/ब या मिळकतीमधून तोडून नेण्याचा अथवा त्यामध्ये हरकत, अडथळा करण्याचा अधिकार प्रथमदर्शनी वादींना नाही. झाडे तोडून नेल्यास प्रतिवादी क्र. ६ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. कारण त्या मिळकतीचा उपभोग प्रतिवादी क्र. ६ घेत आहे. त्यामुळे, न्यायाचा समतोल प्रतिवादी क्र. ६ चे बाजूने आहे व अर्ज नामंजूर झालेस प्रतिवादी क्र. ६ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे, अर्ज मंजूर करावा.

९. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. ६ हे स्वच्छ हाताने न्यायालयापुढे आलेले नाहीत. प्रतिवादी क्र. ६ यांनी गट क्र.

१५२/ब या मिळकतीमधील झाडे तोडून नेत असल्याचा आरोपी वादीवर केला आहे. परंतु, यापुर्वी नि. ५ मध्ये जर प्रतिवादी क्र. ६ चा गट क्र. १५२ मध्ये ताबा आहे असे जरी निरीक्षण नोंदवले असले तरी गट क्र. १५२/अ मध्ये वादींचा ताबा आहे असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे व तसा मनाई आदेश नि. ६९ अन्वये मंजूर केला असून गट क्र. १५२/अ मधील मिळकतीस हरकत, अडथळा करु नये. असा मनाई आदेश प्रतिवादी क्र. ६ विरुद्ध मंजूर झाला आहे. वास्तविक, वादीने गट क्र. १५२/अ या मिळकतीमधील झाडे तोडण्यापूर्वी वन विभागाची परवानगी घेतली होती व त्या संदर्भात अर्ज देखील केला होता व संबंधीत विभागाने मंजुरी दिल्याची कागदपत्रे देखील नि. १२९ अन्वये वादीने दाखल केली आहेत. याहीपलीकडे, प्रतिवादी क्र. ६ यांनी जेव्हा तक्रारी अर्ज दाखल केला, त्यानंतर पंचनामा करण्यासाठी पंच हे गट क्र. १५२/अ मध्ये आले व त्यांनी दि. २४/०५/२०२३ रोजी पंचनामा केला आहे. त्यानुसार वादी यांनी दावा मिळकतीधील गट क्र. १५२/अ या मिळकतीमधील झाडे तोडली आहेत असे निरीक्षण त्या पंचनाम्यामध्ये आहे व गट क्र. १५२/ब मधील झाडे तोडली आहेत असे पंचनाम्यावरुन कोठेही दिसून येत नाही. त्यामुळे, न्यायाचा समतोल प्रतिवादी क्र. ६ च्या बाजूने नाही व झाडे तोडलेली नसलेमुळे व हरकत, अडथळा केला नसलेमुळे प्रतिवादी क्र. ६ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल, असे प्रतिवादी क्र. ६ ने दाखवून दिलेले

नाही. त्यामुळे, अर्ज नामंजूर करावा.

१०. वादीने गट क्र. १५२/अ मधील झाडे तोडणेबाबत परवानगी घेतली आहे व त्याबाबतची कागदपत्रे देखील वादीने दाखल केली आहेत. तसेच वादीने प्रतिवादी क्र. ६ ची तक्रार आल्यानंतर वनविभागामार्फत जो पंचनामा करण्यात आला त्या पंचनाम्यामध्ये गट क्र. १५२/अ मध्ये पंच गेले व गट क्र. १५२/अ ची झाडे तोडल्याची पाहणी केल्यावरुन त्यांना दिसून आले असे पंचनाम्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. प्रतिवादी क्र. ६ चा आक्षेप देखील त्यामध्ये नोंदवला आहे. परंतु, गट क्र. १५२/ब मधील झाडे तोडल्याचे पंचनाम्यावरुन दिसून येत नाही. प्रस्तुतचा मनाई अर्ज हा प्रतिवादी क्र. ६ ने दि. ०१/०७/२०२३ रोजी दाखल केला आहे व अर्जामध्ये असे कथन केले आहे की, दि. १२/०४/२०२३ रोजी अंगबळाच्या जोरावर झाडे तोड केली आहे व ती पळवून नेण्याच्या तयारीत वादी आहेत. परंतु, जर गट क्र. १५२/ब मधील झाडे तोडली असती तर दि. २४/०५/२०२३ रोजीच्या पंचनाम्यामध्ये तशी परिस्थीती दिसून आली असती. त्यामुळे, जरी नि. ५ च्या आदेशामध्ये न्यायालयाने प्रतिवादी क्र. ६ चा ताबा गट क्र. १५२/ब मध्ये आहे असे निरीक्षण नोंदवले असले तरी अर्जातील कथनांवरुन व वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी असे दिसून येत नाही की, गट क्र. १५२/ब मधील झाडे वादीने तोडली. त्यामुळे, प्रतिवादी क्र. ६ चे बाजूने केवळ ताबा दाखवल्यामुळे

प्रथमदर्शनी केस आहे असे वाटत नाही. कारण, गट क्र. १५२/ब मध्ये वादीने झाडे तोडली अथवा त्यामध्ये हरकत, अडथळा केला असे प्रथमदर्शनी दिसून आले नाही. याउलट वादीने दाखल केलेला पंचनामा व गट क्र. १५२/अ मधील झाडे तोडण्याच्या परवानगी बाबतीतील कागदपत्रे यांचा विचार करता गट क्र. १५२/ब मधील झाडे तोडली आहेत असे दिसून येत नाही. त्यामुळे, हरकत, अडथळा गट क्र. १५२/ब या मिळकतीमध्ये केल्याचे प्रथमदर्शनी दिसत नाही. त्यामुळे, न्यायाचा समतोल प्रतिवादी क्र. ६ चे बाजूने दिसून आला नाही व त्यामुळे, अर्ज नामंजूर केलेस प्रतिवादी क्र. ६ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल असे वाटत नाही. त्यामुळे, मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी **'नकारार्थी'** देतो व मुद्दा क्र. ४ करिता खालील आदेश पारित करतो.

| **आ दे श** | |
|---|---|
| १. | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |
| **(खुल्या न्यायालयात जाहीर )** | |

NISHANT DIPAK RUDRABHATE

Digitally signed by NISHANT DIPAK RUDRABHATE Date: 2025.10.17 11:13:29 +0530

**गारगोटी** **(नि. दि. रुद्रभटे)**

दि.– १६/१०/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर गारगोटी